# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच निर्वाहभत्ता मिळाला नसल्याबाबत**

**(१) १३०९६ (१०-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना गेली २ वर्षे शिष्यवृत्ती तर काहींना निर्वाहभत्ता मिळालेला नसल्याने त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलभूत सुविधांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी तीन वेळा उपोषण करुन सुध्दा शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०५-२०१८) :** (१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क देण्याची काही प्रकरणे प्रलंबित आहेत, ही बाब खरी आहे. परंतु राज्यातील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर पर्यंत निर्वाह भत्त्याची सर्व रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सन २०१४-१५ या वर्षात रायगड जिल्हयातील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात दि. १९ व २० डिसेंबर, २०१४ रोजी पनवेल येथील शासकीय वसतिगृहात शिष्यवृत्ती व वसतिगृहातील सोयी सुविधा निगडित मागण्यांबाबत उपोषण केले होते, हे खरे आहे. तथापि, पनवेल येथील उपोषण वगळता राज्यात इतरत्र कोठेही प्रलंबित शिष्यवृत्ती व निर्वाह भत्त्याअभावी उपोषणाचे प्रकार घडलेले नाहीत.

शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. ११.११.२०११ नुसार देय सोयी सुविधा देण्यात येत असून माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर पर्यंतची निर्वाह भत्ता रक्कम अदा केलेली आहे.

सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी अथवा तांत्रिक अडचणींमुळे शिष्यवृत्तीचे प्रस्ताव महाविद्यालयीन, तसेच प्रकल्प स्तरावर प्रलंबित असल्यास, संबंधित त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव प्रकल्प कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन २०१४-१५ या वर्षात महाविद्यालयांचे व अभ्यासक्रमांचे मॅपींग प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणींमुळे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क रक्कम देण्यास विलंब झालेला आहे. सदर तांत्रिक अडचणी दूर करण्यात येत असून महाविद्यालय मॅपींगबाबत व ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क रक्कम तातडीने मंजूर करण्याविषयी प्रकल्प स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

---

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक शिष्यवृत्ती योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२) १४४५३ (१०-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात एकाही संस्थेला मान्यता दिली नसतांना ३०० हून अधिक संस्थांनी अवैधपणे प्रवेश दाखवून शासनाकडून शिष्यवृत्ती करिता रु. ३१ कोटी रक्कम घेतल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील शिष्यवृत्ती गैरव्यवहारात सुमारे १०० अधिक शासकीय कर्मचारी असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित संस्था व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) नाही. भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या (एसआयटी) विशेष चौकशी पथकाने अंतिम चौकशी अहवाल मा.मुख्य सचिवांकडे सादर केला असून, सदर चौकशी अहवालाची पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत सुरु आहे.

(३) नाही.

(४) विशेष चौकशी पथकाच्या अंतरीम अहवालानुसार अनियमिततेप्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधित संस्था विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच त्यांच्याकडून वसुलपात्र रक्कमा वसूल करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांच्या पीककर्जाची फेररचना तीन ऐवजी पाच वर्षात करुन व्याजाचा दर सहा टक्क्यापर्यंत कमी करण्याबाबत**

**(३) २३७९७ (०५-०९-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने ज्या शेतकऱ्यांनी एक लाख रुपयांच्या आत पीककर्ज घेतले आहे, त्याचा बोजा शेतकऱ्यांच्या सातबाराच्या उताऱ्यावरुन कमी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्देशाचे पालन जालना जिल्हयातील बहुतांश बॅका करत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार दोषी व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यातील संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पीककर्जाची फेररचना तीन ऐवजी पाच वर्षात करुन व्याजाच्या दर सहा टक्क्यापर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर निर्णयावर शासनाने अंमलबजावणी केली आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०४-२०१८) :** (१) नाही. तथापि, दिनांक १८/०६/२०१० च्या भारतीय रिझर्व्ह बॅकेच्या परिपत्रकाप्रमाणे रु.१.०० लाखपर्यंतच्या कृषी कर्जाकरिता इतर कुठलेही तारण सहतारण घेण्यात येऊ नये असे निर्देशित करण्यात आले आहे.
(२) नाही. तथापि, याबाबत अग्रणी बॅंक व्यवस्थापक, जालना यांनी अशा प्रकारच्या प्राप्त तक्रारीवर त्यांचे स्तरावर देना बॅंक शाखा जालना व आंध्र बॅंक शाखा, जालना या राष्ट्रीयकृत बॅंकांना सदर निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) होय.

शासनाच्या दि.०३/०६/२०१५ च्या पत्राप्रमाणे रुपांतरीत कर्ज परतफेडीचा कालावधी तीन वर्षावरुन पाच वर्ष करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय, दिनांक २९/०७/२०१५ नुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना

अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रुपांतर करुन जे शेतकरी रुपांतरीत कर्जाचा पहिला हप्ता विहित मुदतीत परत करतील, अशा शेतकऱ्यांना सन २०१५-१६ चे संपूर्ण व्याज व त्यापुढील चार वर्षाचे व्याज ६% दराने अदा करण्यात येते.
(५) अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करण्याबाबत**

**(४) २७३४५ (१४-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करण्यासाठीची मागणी दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजीच्या निवेदनाव्दारे मा.सहकार मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँकेचे विभाजन न झाल्याने स्थानिक जनतेस लहान सहान कामांसाठी ठाणे येथे ये-जा करावी लागत असल्याने त्यांचा वेळ वाया जात असून आर्थिक बोजा पत्करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) प्रस्तुत विभाजनास साधारण किती कालावधी लागणार आहे,
(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०४-२०१८) :** (१) होय.
(२) उपरोक्त निवेदनात या बाबींचा उल्लेख केला आहे.
(३) व (४) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ सभा दिनांक २८/०२/२०१७ मधील ठराव क्र.२४ अन्वये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली असली तरी बँकेच्या विभाजनासंबंधी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठाणे व पालघर जिल्ह्यातील भागधारक संस्थेच्या एकाही पदाधिकाऱ्याने बँक विभाजनाचा ठराव मांडलेला नाही. त्यामुळे तूर्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करण्याबाबतची कार्यवाही झालेली नाही. बँकेचे विभाजन झाले नसले तरी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १०५ शाखांपैकी पालघर जिल्ह्यात बँकेच्या ४० शाखा कार्यरत असल्याने जनतेस ठाणे येथे जाण्याची आवश्यकता नाही. सहकार कायद्यातील तरतूदीनुसार बँकेच्या विभाजनाबाबत बँकेच्या जनरल बॉडीने ठराव संमत करुन निबंधकास व भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. असा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याबाबत निबंधकाच्या स्तरावर निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे व नंदूरबार जिल्हयातील बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन दोषी अधिकाऱ्यांची केलेली बेकायदेशीर नियुक्ती रद्द करण्याबाबत**

**(५) ३३५७१ (२२-१२-२०१५). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकार बँक बचाव कृती समितीच्या निवेदनातील फौजदारी स्वरुपाच्या गंभीर आरोपाची चौकशी करुन बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन दोषी अधिकाऱ्यांची केलेली बेकायदेशीर नियुक्ती रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.सहकार मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) धुळे नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बचाव कृती समिती यांचे दि.१५/११/२०१४ चे पत्र मा.श्री.अनिल गोटे, वि.स.स. यांच्या दि.२४/११/२०१४ च्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना दि.२७/११/२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. सदर पत्राच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि.२८/१२/२०१५ च्या पत्रान्वये सादर केलेला चौकशी अहवाल व बँकेच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील गंभीर दोषांच्या आधारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी आदेश विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग यांनी दि.३०/७/२०१५ रोजी पारित केले आहेत. तसेच सदर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नवीन अधिकारी नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(१) चे निर्देश दिलेले आहेत. बँकेने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सेवानिवृत्त केले आहे. याबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाने मा.अनिल गोटे, वि.स.स. यांना दिनांक १५/२/२०१६ रोजी कळविले आहे.

रिझर्व्ह बँकेकडील टॅफकब सभा क्र.९७, दि.१६/१२/२०१६ सभेतील निर्णयानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१(६) अन्वये सन २०१५-१६ या कालावधीचे फेरलेखापरिक्षण करण्यासाठी अधिकारी नियुक्त करण्यात आला. तसेच टॅफकब सभा क्र.९९, दि.७/४/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार सहकार आयुक्त कार्यालयाने दि.२०/०५/२०१७ च्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ११० अे (१) (iii) नुसार सदर बँकेचे संचालक मंडळ निलंबित करुन श्री.जयसिंग ठाकूर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांची बँकेचे प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत शासकीय आश्रमशाळेमध्ये पाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याबाबत**

**(६) ४८५७५ (२९-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली अंतर्गत मसेली, कोरची, कोटगुल व गॅरापत्ती येथील शासकीय आश्रमशाळेमध्ये पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यास सन २०१४ मध्ये सुरुवात करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना पूर्ण न करताच कंत्राटदाराने कोणतेही बांधकाम न करता बिलाची पूर्ण रक्कमेची उचल केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदार व दोषी अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मोजमाप पुस्तीकेतील नोंदीप्रमाणे निविदा किंमतीच्या सरासरी ८० टक्के बिलाची रक्कम अदा झालेली आहे. तसेच दोषी विरूध्द पोलीस स्टेशन, कोरची येथे फौजदारी गुन्हा क्र.००३२/२०१५, दि.२३/१०/२०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

---

**राज्यातील आदिवासी वसतिगृहे भाडयाच्या इमारतीमध्ये असल्याने विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय**

**(७) ५४३५४ (१२-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विभागामार्फत चालवण्यात येत असलेली सुमारे ७०% वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत असून आवश्यक मुलभूत सुविधा व शासनामार्फत जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा वसतीगृहातील मुला-मुली पर्यंत केला जात नसल्याचे व कागदावरच पुरवठा दाखवला जात असल्याची अतिशय गंभीर बाब दिनांक २४ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर प्रकरणी दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) स्वतंत्र शासकीय इमारत बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, यासाठी किती निधींची आवशकता असून या कामासाठी शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०३-२०१८)** : (१), (२) व (३) राज्यातील आदिवासी विभागामार्फत चालवण्यात येत असलेल्या ४९१ वसतिगृहांपैकी ३२४ वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत आहेत. सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना देय सोयी सुविधा उपलब्ध जागेनुसार विद्यार्थ्यांना देण्यात येत आहेत.

(४) वसतिगृहाचे नवीन टाईप प्लॅन अनुसार अंदाजपत्रके सादर करण्याबाबत संबंधित अधिक्षक अभियंता यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर सदर कामासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

---

### डिग्रस कऱ्हाळे (जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळत नसल्याबाबत

**(८) ५६५२१ (२२-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिग्रस कऱ्हाळे (जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत वारंवार जाऊनही परिसरातील शेतकऱ्यांना एका महिन्यापासून पीक कर्जासाठी अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेकडून शेतक-यांना सुलभरित्या पिककर्ज मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.सुरेश नामदेवराव नाईक राठोड व श्री.ओंकार सखाराम राठोड, रा.वडचुना व इतर यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा डिग्रस कऱ्हाळे या बँकेकडून पुनर्गठणाच्या माध्यमातून पीक कर्ज मिळत नाही अशी तक्रार दिलेली होती.

(२) त्यानुसार महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा डिग्रस कऱ्हाळे या बँकेने शेतकऱ्यांच्या खात्याचे पुनर्गठन करुन अर्जदारास दि.१६/७/२०१६ रोजी पीक कर्ज वाटप केलेले आहे व त्या अनुषंगाने संबंधित तक्रारदारांनी बँकेबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे दि.१६/७/२०१६ रोजी बँकेस कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बोईसर येथील तारापूर एमआयडीसीत सोई सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(९) ६५४४३ (२७-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर येथील  तारापूर एमआयडीसीत असलेल्या फायर स्टेशन मध्ये सोई सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या एमआयडीसीत नियमानुसार साठ पेक्षा अधिक जवान तैनात असणे आवश्यक असताना  सदर ठिकाणी चोवीस जवान असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या जवानांना आग विझविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या सामग्री या निकृष्ट दर्जाच्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, अग्निशमन दलाच्या जवानांना उपयुक्त सामुग्री व सोई-सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

तारापूर औद्योगिक क्षेत्रासाठी सन १९७९ पासून महामंडळामार्फत अग्निशमन सेवा पुरविण्यात येत आहे. यासाठी आवश्यक  २८ कर्मचाऱ्याचा आकृतिबंध मंजुर करण्यात आला असून २४ पदे भरलेली  असून उर्वरित ४ रिक्त  पदे भरण्याची प्रकिया सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

अग्निशमन सेवा केंद्रासाठी  महामंडळामार्फत एक वॉटर टेंडर, एक फोम टेंडर, एक रुग्णवाहिका, एक जीप  इत्यादी यंत्रसामुग्री तसेच इतर अग्निशमन व बचाव उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. महामंडळामार्फत पुरविण्यात आलेली उपकरणे ही भारतीय मानक ब्युरो यांनी प्रसिध्द केलेल्या नियमानुसार व आंतरराष्ट्रीय मांनाकनाप्रमाणे घेण्याली आली असून  त्यातील बरेच साहित्य हे केंद्र शासन व राज्य शासन यांनी निश्चित केलेल्या दरपत्रकाप्रमाणे खरेदी करण्यात आलेले आहे. त्यामुळे साधन सामुग्री  निकृष्ट दर्जाची  असल्याची कुठलीही संभावना नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोंदिया जिल्हयातील औद्यागिक क्षेत्रासाठी राखीव असलेल्या एमआयडीसीच्या भूखंडावर अतिक्रमण करुन बेकायदेशीर उद्योग सुरु केल्याबाबत

**(१०) ७०२९१ (२७-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयातील अनुक्रमे गोंदिया, तिरोडा, देवरी, गोरेगांव आणि अर्जुनी-मोरगांव अशा पाच औद्योगिक क्षेत्रासाठी राखीव ठेवलेल्या एमआयडीसीच्या कोट्यावधी रुपयांच्या भूखंडावर अनेक वर्षापासून अतिक्रमण करुन बेकायदेशीर उद्योग सुरु असल्याचे  दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक विकास महामंडळाच्या कारभाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१७-०४-२०१८) :** (१) गोंदिया जिल्हयातील अनुक्रमे गोंदिया, तिरोडा, देवरी, गोरेगाव आणि अर्जुनी मोरगाव अशा पाच औद्योगिक क्षेत्रासाठी राखीव ठेवलेल्या एमआयडीसीच्या भूखंडावर अनेक वर्षापासून अतिक्रमण करुन बेकादेशीर उद्योग सुरु नाहीत. तसेच अशा प्रकारची बाब दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली नाही व अशा प्रकारची तक्रार महामंडळास प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीककर्ज वाटप बंद केल्याबाबत**

**(११) ७०७०२ (२७-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. या बँकेने नाशिक जिल्हयातील नाशिक, निफाड, दिंडोरी, चांदवड, नांदगांव, येवला, मालेगांव, त्र्यंबकेश्वर व अन्य तालुक्यातील शेतकऱ्यांची पिक कर्जे तसेच फळ बागांची कर्जे सन २०१६ च्या शेती हंगामासाठी मंजूर करूनही वितरीत केलेले नाही, त्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, द्राक्ष उत्पादकांना जिल्हा बँकेकडून कर्ज मिळण्यासाठी शासनाने ३०० कोटी रुपये जिल्हा बँकेला द्यावेत अशा आशयाचे एक निवेदन शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात दिले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने ३९९५३ शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा न केले बाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी व त्या नंतर वारंवार मा.सहकार मंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे केलेल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने विविध कार्यकारी संस्थेच्या माध्यमातून चालू आर्थिक वर्षात ठराविक तालुक्यांना तब्बल २०० टक्क्यापेक्षा वाढीव कर्ज बँकेंमार्फत वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणात ३०० कोटी रूपये शासनाने जिल्हा बँकेला दिले नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०३-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

(३) होय.
(४) नाही. हे खरे नाही.
(५) होय.
(६) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना अशाप्रकारे कर्जवितरणासाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद प्रचलित कायद्यात/नियमात नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) येथील ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत कामांना मंजुरी देण्याबाबत**

**(१२) ७१९८२ (२७-०१-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव (जि.नाशिक) येथील ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय कळवण अंतर्गत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मागील २ वर्षांपासून प्रशासकीय मंजुरी देवून निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदगांव येथील ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत कामांना मंजुरी न देण्याबाबतची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत,
(३) तसेच नांदगांव येथे ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत कामांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०५-२०१८) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
ठक्कर बाप्पा योजनेचा निधी आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मंजूर होत असून मतदार संघनिहाय मंजूर होत नाही.
नांदगांव मतदार संघात नांदगांव संपूर्ण तालुका व मालेगांव तालुक्यातील ४८ गावांचा समावेश होतो. सदर क्षेत्रात सन २००७-०८ ते २०१६-१७ पर्यंत एकूण ९५ कामांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असून आतापर्यंत रु.३९४.३४ लक्ष इतका निधी खर्च करुन ४६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत व उर्वरित ४९ कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**अमळनेर (जि.जळगांव) येथील चोपडा रस्त्यावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील गृहपालावर कारवाई करण्याबाबत**

**(१३) ७२४०३ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर (जि.जळगांव) येथील चोपडा रस्त्यावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहावर दिनांक ६ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रत्यक्ष पाहणी दरम्यान आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील गृहपालच मद्यसेवन करून कामावर आल्याचे दिसून आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच गृहपाल, कर्मचाऱ्यांच्या दबावाखाली विद्यार्थी वावरत असल्याचेही दिसून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती मद्यसेवन केलेल्या गृहपालावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने शिक्षण विस्तार अधिकारी, प्रकल्प कार्यालय, यावल यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली.
(४) सदर चौकशीनुसार प्रकल्प अधिकारी, यावल, जि.जळगाव यांच्यामार्फत संबंधित वसतिगृहाच्या गृहपालास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुषंगाने संबंधित गृहपाल यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात आला असून सदर गृहपाल यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगांवराजा येथील एम.आय.डी.सी. मध्ये उद्योग सुरु करण्याकरिता भूखंड मिळत नसल्याबाबत**

**(१४) ७२९७३ (२७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगांवराजा येथील एम.आय.डी.सी. मध्ये उद्योग सुरु करण्याकरिता विश्र्वकर्मा इंडस्ट्रीज प्रा.लि., देऊळगावराजा जि.बुलढाणा यांनी मा.विभागीय अधिकारी, एम.आय.डी.सी., अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ पासून अनेक वेळा अर्ज करुनही अद्यापपर्यंत भूखंड मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१७-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही
मे. विश्वकर्मा इंडस्ट्रीज प्रा.लि., यांनी भूखंड मिळणेबाबतचा अर्ज दिनांक ०१/१२/२०१५ रोजी महामंडळाकडे सादर केला होता. तद्नंतर भूखंड वाटप समितीची बैठक दिनांक २८/०३/२०१६ रोजी घेण्यात आली. त्यामध्ये सदर कंपनीचा अर्ज मंजूर करण्यात येऊन दिनांक २०/०१/२०१७ रोजी भूखंड वाटप करण्यात आलेला असून भूखंडाचा ताबा दिनांक २३/०८/२०१७ रोजी देण्यात आलेला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील नागरिकांना आदिवासी उपयोजनेंतर्गत घरकुल योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(१५) ७८१६९ (२८-११-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील नागरिकांना आदिवासी उपयोजनेअंतर्गत घरकुल योजना व इतर विविध वैयक्तिक मुलभूत योजनांचा लाभ मिळण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश अप्पर आयुक्तांनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पास देवूनही प्रकल्प अधिकारी कार्यालयाने येथील आदिवासी नागरिकांना मुलभूत योजनांपासून वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर भागातील आदिवासी नागरिकांना घरकुल योजना व इतर वैयक्तिक मुलभूत योजनांचा लाभ देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मौजे देवळाणे, ता.येवला येथील ५५ लाभार्थ्यांपैकी १९ लाभार्थ्यांना घरकुल मंजुर असून त्यापैकी ३ घरकुलांचे काम पुर्ण झाले आहे. तसेच १० घरकुल प्रधान मंत्री आवास योजने मधून मंजूर आहेत व ६ लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत लाभ देण्यात आला असून काम प्रगतिपथावर आहे. तसेच उर्वरित ३६ लाभार्थ्यांचे प्रधानमंत्री घरकुल आवास योजना “ड” यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे.

वैयक्तीक लाभाच्या योजनेंर्गत येवला तालुक्यातील लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे एच.डी.पी.ई पाईप व तेलपंप मंजुर केलेले आहेत.

| योजना | सन २०१५-१६ | सन २०१६-१७ |
|---|---|---|
| एच.डी.पी.ई.पाईप | १० | २० |
| तेलपंप | २७ | ०६ |

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांचे स्तरावरुन सन २०१७-१८या वित्तिय वर्षात केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत वैयक्तीक योजना महिलांसाठी आटाचक्की, फळबागांसाठी अर्थसहाय मत्स्य व्यवसाय, सिक्युरिटी गार्ड प्रशिक्षण, एकलव्य ब्रासबँडबाबत दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्याअनुषंगाने ६ लाभार्थ्यांच्या प्राप्त अर्जामधून ४ पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत प्रकल्पस्तरावरुन कार्यवाही सूरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नोटाबंदीनंतर जिल्हा बँकाना वगळून राज्य बँकेमार्फत राज्यातील सेवा सोसायट्यांना थेट अर्थपुरवठा करण्याबाबत**

**(१६) ८१०७९ (२१-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोटाबंदीनंतर जिल्हा बँकाना वगळून राज्य बँकेमार्फत राज्यातील सेवा सोसायट्यांना थेट अर्थपुरवठा करण्याबाबत व राज्य सहकारी बँकेच्या ७ नवीन शाखा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने सद्यःस्थिती काय आहे व अद्याप निर्णय झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०३-२०१८) :** (१) नाही.

याबाबत राज्य शासनाकडून कोणतेही निश्चित धोरण जाहीर केलेले नाही किंवा त्याबाबतचे आदेश निर्गमित केलेले नाहीत.

तथापि, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतर्फे दिनांक ०३/११/२०१६ रोजी जिल्हा बँकांच्या राज्यस्तरीय परिषदेमध्ये केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या स्तरावर बँकेच्या दिनांक ३१/०७/२०१७ च्या प्रशासकीय मंडळ - कार्यकारी समितीच्या सभेत अर्थक्षम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना राज्य बँकेमार्फत थेट कर्ज पुरवठा करण्याबाबतचे धोरण संमत केले आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्य सहकारी बँकेस पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, धुळे, बीड व नांदेड या सात ठिकाणी नवीन शाखा सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्य बँकेने सातही ठिकाणी नवीन शाखा सुरू केल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांसाठी असलेले अनुदान जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून शेतक-यांना वाटप केले नसल्याबाबत**

**(१७) ८३९७० (१९-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील २५ हजार ६९६ दुष्काळग्रस्त शेतक-यांसाठी ११ कोटी ४० लाख ३७ हजार ७१६ रुपयांचे अनुदान शासनाकडून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे वर्ग करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेकडून शेतक-यांना अद्यापही अनुदान वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँक संचालकावर कारवाई करण्याबाबत व सदर अनुदान शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०४-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही. अनुदानापोटी प्राप्त रुपये १२२६.७७ लाख रक्कमेपैकी परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने २६८७८ शेतकरी सभासदांच्या खात्यावर रूपये ११९७.१२ लाख अनुदान वाटप केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिल्हा बँकामधील जुन्या नोटा बदलून देण्याबाबत

**(१८) ८५०२३ (१८-०८-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात २१ ऑक्टोबर, २०१६ रोजी नोटाबंदी होऊनही राज्यातील ३४ पैकी ३२ जिल्हा बँकमधील ८ हजार कोटी पेक्षा जास्त जुन्या नोटांची पडताळणी अद्याप झालेली नसल्याने या चलनाच्या संदर्भात सध्या काहीही निर्णय घेता येणार नाही, अशी भूमिका रिझर्व्ह बँकेने घेतल्याने लाखो शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळणे कठीण झाल्याने त्यांचा खरिप हंगाम धोक्यात आल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोटाबंदी लागू होताच जिल्हा बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने दिनांक १० ते १३ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत खातेदारांकडून पाचशे व एक हजाराच्या रुपयांच्या स्वीकारलेल्या नोटा बदलून देण्यास रिझर्व्ह बँकेने नकार दिला तथापि बिगर सहकारी बँकांना नोटा बदलून देण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड जिल्हा बँकेत नोटाबंदीच्या काळात ४५०० ठेवीदारांनी १४ कोटी ५० लाख रुपये जमा केले असून या नोटा बँकेतच पडून असल्याने बँकेला वर्षाकाठी ४५ लाख रुपयांचे व्याज ठेवीदारांना दयावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(५) असल्यास, त्यानुसार जिल्ह्या बँकामधील जुन्या नोटा बदलून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०३-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये दिनांक १८/०३/२०१७ रोजी जुन्या रूपये ५००/- व १०००/- च्या रुपये २७७१.८६ कोटी किंमतीच्या नोटा शिल्लक होत्या.

(२) होय.

(३) व (४) नाही. नोटाबंदीच्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी केंद्र शासन व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडे राज्य शासनाने सातत्याने पाठपुरावा केला. डिसेंबर, २०१६ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांनी शिष्टमंडळासोबत मा.केंद्रीय वित्तमंत्री यांची भेट घेऊन जिल्हा मध्यवर्ती बँका व सहकारी पतसंस्थांना तसेच नागरीकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

परिणामी वित्त मंत्रालयाने दि. २०/६/२०१७ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली. त्यानुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. २९/६/२०१७ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी दि.१०/११/२०१६ ते दि.१४/११/२०१६ या कालावधीत आपल्या ग्राहकांकडून स्विकारलेल्या ५००/- व १०००/- च्या नोटा स्विकारण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माय स्कूल जयसिंगपूर (जि.कोल्हापूर) व हरीलाल स्कूल (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) या दोन शाळांनी आदिवासी विद्यार्थ्यांचे अनुदानात केलेला गैरव्यवहार**

**(१९) ८५०३७ (०९-०८-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर अंतर्गत माय स्कूल जयसिंगपूर (जि.कोल्हापूर) व हरीलाल स्कूल (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) या दोन शाळांचा तपासणी अहवाल अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे यांना दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालात कोणकोणत्या बाबी निदर्शनास आल्या आहेत,

(३) तसेच आदिवासी विद्यार्थ्यांचे नावे शासनाच्या अनुदानात गैरव्यवहार करुन आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयीसुविधापासून वंचित ठेवणाऱ्या शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

प्रकल्प अधिकारी, सोलापूर अंतर्गत माय स्कूल, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर; हरिलाल इंग्लिश स्कूल, उमरगा, जि.उस्मानाबाद व गुरूकूल प्रायमरी ॲन्ड सेकंडरी स्कूल, कुसमोड, जि.सोलापूर या शाळांचा तपासणी अहवाल अपर आयुक्त, ठाणे यांना सादर केला होता.

(२) सदर चौकशी अहवालात प्रस्तुत शाळांमार्फत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येत असलेल्या सुविधांमध्ये कमतरता असल्याचे तसेच सदर शाळा योजनेंतर्गत आवश्यक निकष पूर्ण करित नसल्याच्या बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

(३) प्रकल्प अधिकारी, सोलापूर यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अपर आयुक्त, ठाणे यांच्या स्तरावर सदर शाळांची फेरतपासणी करण्यात आली व त्यांच्या शिफारशीनुसार हरिलाल इंग्लिश स्कूल, उमरगा, जि.उस्मानाबाद व गुरूकूल प्रायमरी अॅन्ड सेकंडरी स्कूल, कुसमोड, जि.सोलापूर या शाळांची नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गतची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाताळगंगा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांवर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(२०) ८५०९२ (०४-०९-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाताळगंगा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात विविध कंपन्यांनी कामगारांसाठी कंपन्यांसमोरच उभारत असलेल्या वसाहतींमुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांवर अन्याय होत असून स्वच्छता, सुरक्षितता व अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त औद्योगिक वसाहतीत कंपन्या वाढत असून मोठया संख्येने कामगार वर्ग कासप, चावंढोळी, जांभिवली, चावणे, सवणे या गावात प्रकल्पग्रस्तांनी आपल्या उपजीवीकेसाठी उभारलेल्या चाळीमध्ये राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागातील कंपन्यांनी कामगारांना राहण्यासाठी रस्त्यालगतच उभारलेल्या वसाहतींमुळे प्रकल्पग्रस्तांनी आपल्या उपजीवीकेसाठी उभारलेल्या चाळी रिकाम्या राहणार असून उक्त वसाहतींमुळे नियोजनाअभावी स्वच्छता व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार स्थानिक प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०४-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) होय.

प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समिती अतिरिक्त पाताळगंगा म.औ.वि. महामंडळ चावणे विभाग यांचे दि. १६/०६/२०१७ रोजीचे पत्र उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उपविभाग पाताळगंगा यांचे कार्यालयास प्राप्त झाले. प्रस्तुत पत्रामध्ये मेसर्स बालाजी फॉर्मालीन, मेसर्स इजीपीएन व मेसर्स ॲन्थॉनी टायटन कंपनी शेजारी व एम.आय.डी.सी च्या हद्दीत रोड शेजारी कामगार वसाहती उभारल्याचे व त्यांना विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा वर नमूद केलेल्या कंपनीकडून होत असल्याचे नमूद केलेले आहे व संबंधित वसाहतीमुळे स्थानिक कामगार प्रकल्पग्रस्त गावे यांचेवर अन्याय होत आहे असे कळविले आहे. पत्र मिळाल्यानंतर मेसर्स बालाजी फॉर्मालीन, मेसर्स इजीपीएन व मेसर्स ॲन्थॉनी टायटन कंपनी या कंपनीच्या प्रतिनिधीना दिनांक २२/०६/२०१७ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तात्पुरत्या स्वरुपाचे लेबर कॅंप हटविणे-विषयी उप विभागीय कार्यालयामार्फत आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या व त्या प्रतिनिधीनी तात्पुरते लेबर कॅंप हटविणेविषयी मान्य केले होते व त्याप्रमाणे मे. बालाजी फॉर्मालिन कंपनीने व मे.ॲन्थानी टायटन कंपनीने लेबर कॅंप हटविले आहेत. मेसर्स ईजीपीएन कंपनीने लेबर कॅंप हटविले नाहीत. त्यामुळे मे. इजीपीएन कंपनीला उप अभियंता मऔवि महामंडळ उप विभाग पाताळगंगा (स्थापत्य) यांनी दिनांक १२/१२/२०१७ नुसार पुनश्च: सुचना देऊन अशा प्रकारचे लेबर कॅंप दोन दिवसात काढण्याविषयी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. अन्यथा त्यानंतर महामंडळातर्फे सदरील लेबर कॅंप काढण्यात येऊन त्याचा खर्च मे. इजीपीएन कंपनीकडून वसूल करण्यात येईल, अशी नोटीस देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील आंबा, काजू, नारळ पिकाला हमीभाव देण्याबाबत**

**(२१) ८५५०१ (१८-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील आंबा, काजू आणि नारळ या पिकांना हमीभाव मिळत नसल्यामुळे कोकणातील शेतकरी शासनाच्या सवलतींपासून दूर राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंबा, काजू आणि नारळ या पिकांना हमीभाव देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) केंद्र शासनामार्फत कृषी मालाला हमी भाव देण्यासंदर्भात कामकाजासाठी सन १९८५ मध्ये कमिशन ऑफ ॲग्रीकल्चर कॉस्ट ॲण्ड प्रायसेसची स्थापना करण्यात आली असून त्याचा मुख्य उद्देश कृषी मालासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करून उत्पादकांना सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रवृत्त करणे असा आहे. सद्य:स्थितीत या कमिशन मार्फत विविध २३ कृषी उत्पादनांची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली असून

त्यामध्ये भात, गहू, मका, ज्वारी, बाजरी, नाचणी, तूर, मूग, उडीद, कापूस, भूईमूग, सूर्यफूल, सोयाबीन, तीळ, कारळ, बारली, मसूर, मोहरी, करडई, खोबरे, ज्यूट, ऊस व तंबाखू या पिकांचा समावेश आहे. यामध्ये कोणत्याही नाशवंत फळे व भाजीपाल्याचा समावेश नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे निपाणा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर सामाजिक सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(२२) ८६५९६ (१८-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निपाणा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील सन २०१४-१५ मधील दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर सामाजिक सभागृहाचे बांधकाम मागील दोन वर्षापासून प्रलंबीत असल्याचे दिनांक १ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त सभागृहाचे बांधकाम तात्काळ पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ते (४) मौजे निपाणा, ता.मोताळा, जि.बुलडाणा येथे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास (ग्रामीण) करणे योजनेंतर्गत सन २०१४-२५ मध्ये निपाणा ग्राम पंचायतीकडून समाजमंदीराचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यानुसार प्रस्तावित ठिकाणी समाज मंदिराचे बांधकाम प्रत्यक्षात सुरु करतेवेळी जागेचा वाद निर्माण झाल्यामुळे बांधकाम सुरु करता आलेले नाही. दरम्यानच्या कालावधीत निपाणा ग्राम पंचायतीकडून जागेचा प्रश्न सोडविण्यात आलेला असून सद्य:स्थितीत समाज मंदिराच्या जोत्यापर्यंतचे (Peanth Level) काम झालेले असून माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत सदर समाज मंदिराचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे.

---

**औरंगाबाद जिल्हा सिमेवरील शेतकरी पीक कर्जापासून वंचित असल्याबाबत**

**(२३) ८६९३४ (१८-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कु-हा (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील स्थायीक परंतू मौजे महालब्धा (ता.सोयगांव, जि.औरंगाबाद) शिवारात शेती असलेले शेतकरी मागील दोन वर्षापासून प्रशासनाच्या दूर्लक्षामुळे पीक कर्जापासून वंचित राहत असल्याची बाब दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहेत काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, सदर शेतक-यांना पीक कर्ज योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०३-२०१८) :** (१) नाही. अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. औरंगाबाद या बँकेची सावळदबारा ता.सोयगांव ही शाखा जालना, जळगांव व बुलढाणा या जिल्ह्याच्या सीमेअंतर्गत येते. या शाखेशी देव्हारी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. ता.सोयगांव जि.औरंगाबाद ही संस्था संलग्न आहे. या संस्थेच्या कार्यक्षेत्रात महालब्धा तालुका सोयगांव (जि.औरंगाबाद) व कुऱ्हा, ता.मोताळा, जि.बुलढाणा ही गांवे आहेत.

कुऱ्हा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील शेतकरी देव्हारी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे सभासद नसल्याने त्यांना कर्ज वितरण झालेले नाही. या गावातील शेतकऱ्यांनी देव्हारी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेकडे सभासद होणे अथवा कर्ज मिळण्यासाठी अर्जही केलेले नाहीत. तसेच, कोणत्याही शेतकऱ्यांच्या याबाबतच्या तक्रारी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.सिल्लोड/सोयगांव यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

महालब्धा गाव संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सावळदबारा, ता.सोयगांव व देव्हारी विविध कार्यकारी सेवा सोसायटीकडे शेतकऱ्यांचे अर्ज अथवा तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने माफ केलेल्या कर्जाची परतफेड संबंधीत सेवा संस्था व बँकांनी शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून परस्पर वसूल केल्याबाबत**

**(२४) ८७३८२ (१८-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने माफ केलेल्या कर्जाची परतफेड संबंधीत सेवा संस्था व बँकांनी शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून परस्पर वसूल केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी याविरुध्द न्यायालयात याचिका दाखल केली असता याचा निकाल शेतकऱ्यांच्या बाजूने केला असूनही अद्यापी कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहे,
(४) असल्यास, न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार शेतकऱ्यांची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करुन शेतकऱ्यांना नविन कर्ज देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२३-०३-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) केंद्र शासन कृषी कर्जमाफी सवलत योजना २००८ च्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नाबार्डच्या निर्देशानुसार केलेल्या वसूलीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे संबंधित शेतकऱ्यांनी रिट याचिका क्र.४३९९/२०१३ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०१/२०१७ च्या आदेशात केंद्र शासनाच्या मूळ योजनेत कमाल मर्यादेचा निकष नसल्याने योजनेबाहेरील निकष लावून दिलेला लाभ परत घेऊ नये, असे नमूद केले होते. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सदर आदेशाविरूध्द नाबार्डने मा.सर्वोच्च न्यायालयात SLP क्र. १६०८७/२०१७ दाखल असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) व (५) प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

---

## राज्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक लाभ थेट बँक खात्यात हस्तांतरित करण्याबाबत

**(२५) ८७७२३ (०९-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक लाभ थेट बँक खात्यात हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच वर्गनिहाय अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक लाभ व अनुदान तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०३-२०१८) :** (१) ते (५) राज्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक वापराच्या वस्तुंसाठी इयत्तानिहाय निश्चित केलेली रक्कम थेट बँक खात्यात हस्तांतरीत करण्याचा निर्णय शासन निर्णय दि.२९.०४.२०१७ व दि.०२.०५.२०१७ नुसार घेण्यात आला आहे. सदर निर्णयास अनुसरुन प्रथम ६०% रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्याम जमा करुन, उर्वरित ४०% रक्कम विद्यार्थ्यांने सर्व वस्तुंची खरेदी केल्याची खात्री केल्यानंतर विद्यार्थ्यांचे खात्यात जमा करण्यांत आलेली आहे. सबब याबाबत कोणतीही तक्रार नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयात वन हक्क दाव्याच्या पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ८७९८४ (११-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी अधिनियमांनुसार वन हक्क दाव्याची पडताळणी करण्याचे आदेश आदिवासी विभागाने देऊनही वन हक्क

दाव्याच्या पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे वन विभागाच्या जमिनीवर भूमिहिन, बेरोजगार व आदिवासींना उदरनिर्वाहासाठी वन जमिनीत मशागतीकरिता अडवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२३-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) होय.

जिल्हाधिकारी, बुलढाणामार्फत अनधिकृत अतिक्रमणधारकांवर शासन नियमानुसार कारवाई करण्यांत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हा समाजकल्याण विभागात कामांसाठी येणाऱ्या अपंगाची गैरसोय होत असल्याबाबत

**(२७) ८८९७७ (१८-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या समोरील समाजकल्याण विभागात कामांसाठी अपंग दूरवरुन येत असून त्यांना बसायला जागा, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच निवारा नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील अपंगाची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०५-२०१८) :** (१) व (२) जिल्हा परिषद,सोलापूर यांच्या कार्यालयाच्या समोर समाज कल्याण विभागाचे कार्यालय तसेच अपंग व्यक्तीसाठी सल्ला व मार्गदर्शन केंद्र कार्यरत असून तेथून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अपंग कल्याणशी संबंधित योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. तेथे येणाऱ्या नागरिकांकरिता बसण्यासाठी जागा तसेच पिण्याचे पाणी इत्यादींची सोय जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दिव्यांगासाठी सुरू असलेल्या शाळांतील अभ्यासक्रम कालबाह्य असल्याने दिव्यांग रोजगारापासून वंचित असल्याबाबत**

**(२८) ८९९०९ (१८-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगासाठी २० वर्षापासून विशेष शाळा व कर्मशाळा अशा एकूण १५३६ कर्मशाळा आहेत, त्यापैकी अनुदानित ८५२ तर विनाअनुदानीत ६८४ शाळा सुरू असून सदर शाळांतील अभ्यासक्रम कालबाह्य असल्याने दिव्यांगाना रोजगार उपलब्ध होत नसल्याचे दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष शाळा व कर्मशाळातून दिव्यागांना रोजगार उपलब्ध होण्यासंबधी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडगांव हवेली (ता.कराड, जि.सातारा) येथील दोन शेतकरी भावांनी केलेली आत्महत्या**

**(२९) ९०१३४ (१८-०८-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीपूरक व्यवसायासह शेतीसाठी काढलेल्या कर्जाची परतफेड करणे अशक्य झाल्याने बँकांचा कर्ज वसुलीचा तगादा आणि शेती मालास योग्य हमीभाव न मिळाल्याच्या नैराश्यातून वडगांव हवेली (ता.कराड, जि.सातारा) येथील दोन सख्या शेतकरी भावांनी दिनांक २ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-०३-२०१८) :** (१), (२) व (३) कराड तालुक्यातील बँका व पतसंस्था यांची चौकशी केली असता कै.श्री. विजय कृष्णा चव्हाण रा. वडगाव हवेली व कै.श्री. जगन्नाथ कृष्णा चव्हाण यांनी वडगाव हवेली वि.का.स. सेवा सोसायटी यांच्याकडून दि.१७/३/२०१६ रोजी अल्पमुदत कर्ज प्रत्येकी रू.४२५००/- उचल केले होते. सदर कर्ज थकित नसून दि.३०/६/२०१७ रोजी थकित (देय) होते.

कै. जगन्नाथ कृष्णा चव्हाण व कै. श्री.विजय कृष्णा चव्हाण सहकर्जदार रा.वडगाव हवेली यांचे दि कराड अर्बन को-ऑप. बँक लि. कराड यांच्याकडून शेती खरेदीसाठी रू.३५,००,०००/- व कॅश क्रेडिट कर्ज रू. ४,००,०००/- असे एकूण ३९,००,०००/- कर्ज आहे.

कै. जगन्नाथ कृष्णा चव्हाण रा. वडगाव हवेली यानी यशवंत को-ऑप. बँक लि. फलटण शाखा कराड यांच्याकडून रू. ८५,००,०००/- जे.पी. ॲग्रो कर्ज घेतल्याचे दिसून येते.

(४) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सातारा यांच्या दिनांक ०६/०९/२०१७ रोजीच्या पत्रानुसार सदर आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसास अर्थसहाय्य देण्यासाठी चौकशी होऊन दिनांक ०८/०८/२०१७ रोजीच्या जिल्हास्तरीय कमिटीच्या बैठकीमध्ये दिनांक २३/०१/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर प्रकरण पात्र होत नसल्याने अपात्र ठरविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कर्नाटकसह इतर जिल्ह्यातील उत्पादित गुळाची कोल्हापूरी गुळाच्या नावाने विक्री होत असल्याबाबत**

**(३०) ९०१६१ (१८-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरी गुळाला 'जी.आय.' (भौगोलिक उपदर्शन / जीओग्राफीकल इंडिकेशन) मंजूर झाला असल्याने कोल्हापूर व्यतिरिक्त इतर ठिकाणच्या शेतकऱ्यांना 'कोल्हापूर गुळ' या नावाने गुळाची विक्री करण्यास मनाई करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्नाटकसह इतर जिल्ह्यातील उत्पादित गुळाची 'कोल्हापूर गुळ' या नावाने विक्री होत असून बाजार समितीकडून 'जी.आय' च्या अंमलबजावणीसाठी कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच कोल्हापूर गुळ' या नावाने विक्री करत असलेल्या दुस-या उत्पादकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०४-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर या समितीचे कार्यक्षेत्रातील गुळ उत्पादक शेतकऱ्यांच्या गुळास परदेशात बाजारपेठ उपलब्ध व्हावी याकरीता बाजार समितीने केंद्र शासनाचे महानियंत्रक, व्यापार चिन्ह तथा भौगोलिक संकेत, चेन्नई यांचेकडून "कोल्हापूर गुळ" भौगोलिक उपदर्शन (जी.आय.) मान्यता दि.३१.३.२०१४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

कर्नाटकसह इतर जिल्ह्यातील उत्पादित गुळाची "कोल्हापूर गुळ" म्हणून विक्री करत असल्याबाबत बाजार समितीकडे लेखी तक्रार प्राप्त झाली नाही.

"कोल्हापूरी ब्रँड" च्या गुळ उत्पादन पद्धतीने आणि विक्री व्यवस्था याबाबत गुळ उत्पादक शेतकरी, गुऱ्हाळमालक, गुळवे, व्यापारी यांची व्यापक कार्यशाळा बाजार समितीमार्फत दि.११.१२.२०१३ व दि२३.१.२०१५ रोजी श्री. शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर येथे आयोजित केलेली होती. सदर कार्यशाळेत गुळ उत्पादकांना गुळ उत्पादनासंदर्भात व जी.आय. मानांकनानुसार गुळ उत्पादन करणेबाबत तज्ञांमार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यभरातून वाढलेल्या विजेच्या मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी असल्याने भारनियमन सुरु असल्याबाबत

**(३१) ९०७८१ (०९-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातून वाढलेल्या विजेच्या मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी असल्याने भारनियमन सुरु करण्यात आले असून त्यास एकलहरे (जि.नाशिक) औष्णिक केंद्रामधील नादुरुस्ती व तोकडे संचदेखील कारणीभूत असल्याचे दि. ६ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकलहरे औष्णिक विद्युत केंद्रावर सुमारे चार वर्षांपूर्वी पाच संचाद्वारे निर्मिती केली जात होती मात्र दोन संच सुमारे तीस वर्षापेक्षा अधिक जुने झाल्यामुळे ते कालबाहय ठरविले गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ मधील जुने संच बदलून नविन संच जोडण्याबाबत व सुरु असलेले भारनियमन बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील २ संच (२ X १२५ मे.वॅ.) कालबाहय व जीर्ण झाल्याने दि. ३०.०६.२०११ रोजी कायमस्वरुपी बंद करण्यात आले आहेत.

नाशिक येथील उर्वरित ३ संच (३ X २१० मे.वॅ.) वीजनिर्मितीसाठी उपलब्ध आहेत.

(३) नाशिक येथे ६६० मे.वॅ. चा विद्युत निर्मिती प्रकल्प प्रस्तावित असून सदर प्रकल्पातील चिमणीच्या उंचीसाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करण्यासाठी केंद्रीय संरक्षण मंत्रालयाकडे पाठपुरावा सुरु आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या एम.ओ.डी. प्रणाली तत्वानुसार सदर प्रकल्प वाणिज्यिकदृष्टया व्यवहार्य (Viable) देखील असणे आवश्यक आहे.

दरम्यान राज्यात मागणीनुसार वीजेचा पुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीने व्दिपक्षीय कराराव्दारे ५०० मे.वॅ. वीज उपलब्ध करुन घेतली आहे. तसेच बँकीग पध्दतीने करार करुन माहे एप्रिल व मे महिन्यामध्ये दिवसा वीजेच्या मागणीनुसार २०० ते ३०० मे.वॅ. वीज उपलब्ध करुन घेतली आहे. घाटघर विद्युत निर्मिती केंद्राचा प्रभावी वापर आणि आवश्यक त्या काही तासांसाठी पॉवर एक्सचेंजमधून ३०० ते १,८०० मे.वॅ. पर्यन्त वीज खरेदी करुन वीजेची तूट भरुन काढली आहे. अशा प्रकारे महावितरण कंपनीकडून वीजेची मागणी व उपलब्धता यांचा मेळ घालण्यात आला. त्यामुळे दिनांक ०७.०५.२०१७ नंतर अद्यापपर्यंत राज्यात भारनियमन करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील बेलदा येथील शासकीय आश्रमशाळेत ठेवलेले शेती उपयोगी साहित्य चोरीला गेल्याबाबत**

**(३२) ९२००७ (०९-०८-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विभागामार्फत चालविण्यात येणा-या रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) बेलदा येथील शासकीय आश्रमशाळेत ठेवलेले शेती उपयोगी साहित्य चोरीला गेल्याप्रकरणी आश्रमशाळेतील चार विद्यार्थ्यांना अटक करून दीड महिन्यांपासून शाळेत घेतले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना वसतिगृहात ठेवायचे की नाही हा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०४-२०१८) :** (१) व (२) केंद्रवर्ती अर्थसंकल्पीय (न्युक्लीअस बजेट) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वाटप करावयाचे साहित्य शासकीय आश्रमशाळा बेलदा, ता. रामटेक, जि. नागपूर येथे ठेवण्यात आले होते. सदर साहित्य दि.१७/१२/२०१६ रोजी रात्री चोरीस गेल्याने प्रकरणी पोलीस स्टेशन, देवलापार येथे फौजदारी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात बेलदा शासकीय आश्रमशाळेतील ४ विद्यार्थ्यांना चोरीच्या आरोपात अटक करण्यात येऊन त्यांची जामीनावर सुटका करण्यात आली आहे. संबंधीत चारही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सदरील शाळेतील शिक्षकांनी चारही विद्यार्थी व त्यांच्या पालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना समुपदेशन करून विद्यार्थ्यांना शाळेत बोलवून त्यांचा गैरहजर कालावधीतील अभ्यासक्रम पूर्ण करून घेतला असून त्यांना वार्षिक परिक्षेस बसण्यासाठी प्रविष्ठ करण्याबाबत प्रयत्न करण्यात आले. त्यापैकी ३ विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षा दिली असून एक विद्यार्थी वारंवार विनंती व समुपदेशन करूनही वार्षिक परीक्षेस बसलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या २९ शासकीय आश्रमशाळांची झालेली दुरवस्था

**(३३) ९२९९६ (०९-०८-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २९ शासकीय आश्रमशाळा असून तेथे १७ हजार ५५० विद्यार्थी निवासी वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी मुलांच्या शिक्षणाकरिता आदिवासी विकास विभागाकडून दरवर्षी ५०० कोटी रुपये खर्च होतात मात्र उक्त आश्रमशाळांतील मुलांना वेळेत जेवण व नाश्ता मिळत नसणे, निकृष्ट फळांचा पुरवठा सुरु असणे, यामुळे मुलांची शैक्षणिक पात्रता खालावल्याचेही सर्वेक्षणानंतर निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार उक्त सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (११-०४-२०१८) :** (१) व (२) पालघर जिल्हयातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांचे अंतर्गत एकूण ३० शासकीय आश्रमशाळा असून, सदर आश्रमशाळेत एकूण १७३१९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर आश्रमशाळांपैकी गुहिर, आमगांव व मुरबाड या ३ आश्रमशाळांना मध्यवर्ती स्वयंपाकगृह, कांबळगांव येथून भोजनाचा पुरवठा होत आहे. उर्वरित २७ आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना निश्चित केलेल्या भोजन आहार मानकांनुसार नाश्ता व भोजन दिले जाते. निकृष्ट दर्जाची फळे पुरविल्याची बाब आढळून आली नाही. तसेच उपरोक्त नमूद आश्रमशाळांचा मागील आठ वर्षांचा एस.एस.सी. सरासरी निकाल ८८.४८ टक्के, एच.एस.सी. सरासरी निकाल ७८.४७ टक्के लागला आहे. त्यामुळे शैक्षणिक दर्जा उत्तम असल्याचे दिसून येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणीत जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या संचालकांनी मजुरांच्या नावे कर्ज घेऊन केलेला गैरव्यवहार

**(३४) ९४९६५ (१०-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील त्रिधारा साखर कारखान्याचे एका संचालकाने कारखान्यामध्ये काम देण्याचे आमिष दाखवून कर्ज मागणी पत्रावर मजुरांच्या सह्या घेतल्या व त्या आधारे हिंगोली जिल्ह्यातील भारतीय स्टेट बँकेच्या जवळा बाजार शाखेतून प्रत्येक मजुराच्या नावे लाखो रुपये कर्ज उचलले असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारखान्याच्या सुमारे ४२० ऊस तोडणी मजूरांच्या नावांवर एकूण २० कोटी ८० लाखांचा गैरव्यवहार झाला असून बँकेने कर्जवसुलीसाठी मजुरांना वकिलामार्फत नोटीसा पाठविल्यानंतर हा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करून संबेधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच कर्जाची वसुली दोषींकडून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०३-२०१८) :** (१) नाही.

(२) कारखान्याने कळविल्यानुसार ठेकेदारांनी कर्ज वेळेवर परतफेड न केल्यामुळे बँकेकडून सर्व तोडणी वाहतूक ठेकेदारांना वकीलांमार्फत नोटीसा देण्यात आल्या होत्या.

(३) प्रस्तुत तथाकथित व्यवहार हे त्रिधारा शुगर लि., अमडापूर, पो.सिंगणापूर, ता.जि.परभणी हा खाजगी साखर कारखाना आणि संबंधित बँका आणि संबंधित मजुर यांचेमधील असून खाजगी कारखान्यांच्या बँकांसोबत होणाऱ्या अशा स्वरुपाच्या कर्जाबाबतच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे अथवा कार्यवाही करणे ही बाब कारखान्याच्या अखत्यारितील आहे. तोडणी वाहतूक ठेकेदारांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-जवळाबाजार या बँकेची देणी असलेली आणि Third Party Gurantee नुसार त्रिधारा कारखान्याने बँकेकडे भरणा केलेली रक्कम तोडणी वाहतूक ठेकेदारांकडून वसुल करण्यासाठी कारखान्याकडून कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांची विस्तृत माहिती मिळण्याबाबत

**(३५) ९४९९३ (२८-११-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गृहनिर्माण संस्थाना आपले फेडरेशन बनवायचे असल्यास किती गृहनिर्माण संस्था व सभासद असण्याची आवश्यकता आहे?

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरामध्ये दोनशे पेक्षा कमी सभासद असणाऱ्या गृहनिर्माण संस्था किती आहेत,

(३) तसेच, मुंबई शहर व उपनगरामध्ये शंभरपेक्षा कमी सभासद असणाऱ्या गृहनिर्माण संस्था किती आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०४-२०१८) :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६(३) अन्वये संघीय संस्था स्थापन करणेसाठी किमान ५ संस्था सभासद असणे आवश्यक आहे. संघीय संस्थेमध्ये वैयक्तिक सभासद धारण करण्याबाबत अट नाही.
(२) व (३) मुंबई व उपनगरमध्ये २०० पेक्षा कमी सभासद असलेल्या एकुण २३,४७६ तर १०० पेक्षा कमी सभासद असलेल्या एकूण १७,६९० इतक्या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत.

---

**महाराष्ट्र सावकारी कायदा २०१४ अंतर्गत सुरू असलेल्या प्रकरणाबाबत**

**(३६) ९५०९९ (१०-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र सावकरी कायदा २०१४ अंतर्गत शेतकरी विरूध्द सावकार अशी प्रकरणे सुरू असून, सदर प्रकरणे सावकार ज्या विभागातील रहिवासी आहे त्या जिल्ह्यात वर्ग केली जात असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनिल भारंबे, रा.माळेगांव (ता.मोताळा, जि.बुलडाणा) यांनी त्यांचे उपरोक्त प्रकरण जळगांव जिल्ह्यात वर्ग करू नये याबाबत जिल्हाधिकारी बुलडाणा यांना दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, सावकारी कायदा २०१४ अंतर्गत सुरू असलेली प्रकरणे मुळ शेतकरी ज्या ठिकाणचा आहे त्याच ठिकाणी सुरू ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०३-२०१८) :** (१) नाही.
(२) होय.
(३) व (४) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ तसेच अधिसुचना दि. ०९.१०.२०१४ मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व कार्यक्षेत्रानुसार क्षेत्रीय कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येते.

सदर प्रकरणातील सावकार हे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांच्या कार्यक्षेत्राबाहेरील आहे. मात्र अर्जदार व वादातील शेतजमीन ही बुलडाणा जिल्हातील असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८ (२) अंतर्गत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील के-पूर्व विभागाचे कार्यालय दुसऱ्या ठिकाणी असल्याबाबत**

**(३७) ९६१७३ (०६-०१-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले/अंधेरी/जोगेश्वरी परिसरासाठीचे के पूर्व विभागाचे उपनिबंधक यांचे कार्यालय वडाळा सारख्या दूरच्या ठिकाणी असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील प्रत्येक विभागासाठी उप निबंधक असून त्यांची कार्यालये त्याच विभागामध्ये असणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कार्यक्षेत्रानुसार जागा मिळवणेबाबतचे प्रयत्न केले असता मुंबई सारख्या ठिकाणची भौगोलीक परिस्थती पहाता कार्यक्षेत्रानुसार जागा उपलब्ध होणे शक्य नाही अशी परिस्थिती आहे.

(३) व (४) अशा प्रकारचा कोणताही लेखी पत्रव्यवहार नागरीकांकडून प्राप्त झाला नाही.

नागरीकांच्या सोयीच्या दृष्टीने व पुरेशी जागा उपलब्ध होण्यासाठी एम. टी. एन. एल., वांद्रे (पूर्व) आणि महाराष्ट्र हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन, वांद्रे (पूर्व) यांच्याकडे जागा मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केले होते व त्यासाठी प्रयत्न करुनही जागा उपलब्ध झालेली नाही.

तथापि इतरत्र जागा मिळण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

(५) लागू नाही.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांचे तुर विक्रीचे**
**रु.५ कोटी ३५ लक्ष थकीत असल्याबाबत**

**(३८) ९६४२७ (०३-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिनांक २५ जुलै, २०१७ पासुन तुर विक्री केलेल्या ७६५ शेतकऱ्यांचे १०५३० क्विंटल तुरीचे रु.५ कोटी ३५ लक्ष इतकी रक्कम प्रलंबित असल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, उपरोक्त तुरीचे थकीत रु.५ कोटी ३५ लक्ष अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०४-२०१८) :** (१), (२) व (३) हे अशंत: खरे आहे.

मोताळा कृषी उत्पन्न बाजार समिती, जि.बुलढाणा येथील खरेदी केंद्रावरील खरेदी केलेली तूर, जागे अभावी वखार महामंडळाच्या गोदामात वेळीच जमा न झाल्यामुळे व परिणामी वखारपावती उशिरा प्राप्त झाल्यामुळे तसेच काही शेतकऱ्यांच्या कागदपत्रातील त्रृटीमुळे शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्यासाठी उशिर झाला आहे. मात्र शेतकऱ्यांची चुकाऱ्याची संपूर्ण रक्कम दिनांक ५/१०/२०१७ पर्यंत अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नायगाव, उमरी, मुदखेड (ता.नांदेड) येथील आयसीआयसीआय बँकेच्या तांत्रिक कारणांमुळे निराधारांचे ७ महिन्यांपासून अनुदान थकित असल्याबाबत**

**(३९) ९८१६५ (२९-१२-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव, उमरी, मुदखेड (ता.नांदेड) येथील आयसीआयसीआय बँकेच्या विविध तांत्रिक कारणांमुळे निराधारांचे ७ महिन्यांपासून अनुदान थकले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने पर्यायी मार्ग म्हणून पूर्वी लाभार्थ्यांकडे असलेल्या विविध बॅकांच्या खात्यावरील पासबुकात निराधारांच्या अनुदानाची रक्कम जमा करावी अशी निराधारांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) विशेष सहाय्य कार्यक्रमातंर्गत योजनांतील आयसीआयसीआय बँकेमार्फत बायोमॅट्रीक पध्दतीने लाभार्थ्यांच्या अनुदानाचे वाटप करतांना हाताचे ठसे उमटत नसलेल्या लाभार्थ्यांच्या अनुदानाचे वाटप बँकेमार्फत आधार संलग्न बँक खात्यात करण्यास जिल्हाधिकारी, ठाणे, बीड, नांदेड व कोल्हापूर कार्यालयास दिनांक ११.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-ठाणे-पालघर येथील एमआयडीसीमधील वापराविना पडून असलेल्या भूखंडांबाबत**

**(४०) ९९९९९ (०३-०१-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाणे-पालघर येथील एमआयडीसीमधील विकास न केलेल्या ६७ भूखंडांपैकी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजीपर्यंत भूखंड महामंडळ ताब्यात घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वापराविना पडून असलेल्या भूखंडांना पुन्हा ताब्यात घेण्याबाबत महामंडळाला अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भूखंड लवकरात लवकर ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२३-०३-२०१८) :** (१), (२) व (३) मुंबई ठाणे-पालघर येथील औद्योगिक क्षेत्रातील एकूण ४१ भूखंड आतापर्यंत परत घेण्यात आले आहेत. विहित मुदतीत विकास न केलेल्या भूखंडधारकांवर करारनाम्यातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे. महामंडळाने भूखंड परत घेणेबाबत केलेल्या कार्यवाहीस अनुसरुन ६ भूखंड धारकांनी मा.न्यायालयात दावे दाखल केले आहेत. अशा भूखंड धारकाबाबत मा.न्यायालयाचे निर्णयाचे अधिन राहून सदर भूखंड ताब्यात घेणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील अंबादेवी सहकारी साखर कारखाना बंद स्थितीत असल्याबाबत**

**(४१) १००२०७ (०६-०१-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर व अंजनगाव (सुर्जी) (जि.अमरावती) येथील अंबादेवी सहकारी साखर कारखाना लाखो रुपये खर्च करुन सुद्धा बंद स्थितीत असून, अवसायनात निघाल्यानंतर मे.कायनेटिक पेट्रोलियम प्रा. लि. कपंनीने त्याच ठिकाणी सुरु करण्याच्या अटीवर विकत घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर कारखाना चालू करण्याच्या संदर्भात मा.मंत्री महोदय यांनी दोन वेळा बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, सदर बैठकीला संचालक, मे.कायनेटिक पेट्रेलियम प्रा.लि.कंपनी हजर झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संचालक, मे.कायनेटिक अंबादेवी पेट्रोलिअम प्रा.लि. यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अंबादेवी सहकारी साखर कारखाना सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०३-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेने सरफेसी कायदयाखाली सदर कारखान्याची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करुन दिनांक १२.९.२००८ रोजी विक्री केली आहे. त्यामुळे मे.कायनेटीक अंबादेवी पेट्रोलियम प्रा.लि. यांचे संदर्भात चौकशी करणे बाबत प्रश्न उदभवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील मेह साखर कारखाना पुनर्जीवित करण्याबाबत**

**(४२) १००५६४ (०६-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील मेह साखर कारखाना शासनाने अवसानायात काढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असलेल्या ऊसाची गळती रोखण्यासाठी सदरहू साखर कारखाना पुनर्जीवित करण्यात यावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कारखाना पुनर्जीवित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०३-२०१८) :** (१) होय.
(२) नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) लागू नाही.

---

**पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डात अनधिकृतपणे औषधाचे दुकान सुरु असल्याबाबत**

**(४३) १०१६५५ (०६-०१-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डात अनधिकृतपणे औषधाचे दुकान सुरु करण्यात आले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०४-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. मात्र पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या श्री.छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गुलटेकडी, पुणे येथील गुळ-भूसार बाजार आवारातील भूखंड क्र.४६० वर संबंधित गाळाधारक यांनी माहे सप्टेंबर २०१७ मध्ये बाजार समितीचे पूर्वपरवानगी शिवाय मेडीकल साहित्याचे गोडावूनसाठी भाड्याने दिलेला होता. सदर बाब बाजार समितीच्या निदर्शनास आल्यानंतर माहे सप्टेंबर २०१७ मध्येच त्वरीत सदर गोडावून बंद करण्याची कारवाई करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत त्या ठिकाणी नियमित शेतीमालाचा ठोक व्यवसाय सुरु आहे. तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) यांच्या दि.६.१.२०१८ च्या पत्रान्वये बाजार समितीस अनधिकृत दुकाने, टपऱ्या हटविण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी भागात खावटी कर्ज योजनेच्या धर्तीवर नवीन योजना सुरु करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४४) १०६४८३ (०४-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी भागात सावकार आणि व्यापा-याकंडून होणारी आदिवासी लोकांची पिळवणूक थांबविण्यासाठी तसेच आदिवासी माता बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी खावटी कर्ज योजनेच्या धर्तीवर नवीन योजना सुरु करण्याचा प्रस्ताव गत ३ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असलयास, नवीन योजनेनुसार सहकारी बँकाकडून परस्पर आदिवासी जनतेला कर्जपुरवठा करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने आद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-०५-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) माहे जुन ते सप्टेंबर या ऐन पावसाळयात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासींची उपासमार होऊ नये म्हणून खावटी कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. परंतु सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांकडून कर्जाची परतफेड होत नाही तसेच योजनेतील पात्र लाभार्थ्यी थकबाकीदार असल्याने या योजनेची

अंमलबजावणी डिसेंबर २०१३ पासुन करण्यात आलेली नाही. सध्या या योजनेपोटी रु.२४४.०० कोटी एवढी लाभार्थ्यांकडे थकबाकी आहे. सध्या अंत्योदय योजनेंतर्गत आदिवासी कुटूंबियांना धान्य उपलब्ध करुन देणे अमृत आहार टप्पा १ व २ अंतर्गत गरोदर स्त्रियांना, स्तनदा माता यांना एकवेळ आहार देणे तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयाच्या बालकांना अंडी/केळी उपलब्ध करुन देण्याच्या योजना प्रवाभीपणे राबविण्यात येत आहे.

---

**अंढेरा (जि.बुलढाणा) येथील ग्रामशिंदी येथे संपूर्ण दारु बंदी होण्याबाबत**

**(४५) १०६५२७ (०४-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंढेरा (जि.बुलढाणा) येथून जवळच असलेल्या ग्रामशिंदी येथे संपूर्ण दारु बंदी व्हावी याकरिता प्रा.निलेश बंगाळे व सौ.सुनिता खरात व इतर ग्रामस्थांनी आत्मदहन करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१८) :** (१), (२) व (३) होय. श्री.निलेश बंगाळे व सौ.सुनिता खरात यांनी शिंदी गावामध्ये दारुबंदी झाली नसल्याने आणि अवैध दारु विक्रेत्यावर कारवाई न केल्याने ठाणेदार व पोलीस पाटील यांचेवर निलंबनाची कारवाईची मागणी मान्य न झाल्यास पोलीस अधीक्षक,बुलडाणा यांना निवेदनाद्वारे आत्मदहनाचा इशारा दिला होता. सदर निवेदनाच्या अनुषंगाने, पोलीस विभागाकडून अवैध दारु विक्री व बाळगणेबाबत संबंधितांविरूध्द मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५ ई नुसार ३ गुन्हे नोंदविण्यात आले असून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. श्री.निलेश बंगाळे व सौ.सुनिता खरात यांनी आत्मदहनाचा दिलेला इशारा मागे घेत असल्याचे पोलीस विभागास लेखी निवेदन दिले आहे. ग्रामशिंदी येथे दारुबंदीबाबतचे निवेदन उपविभागीय सिंदखेडराजा यांचेमार्फत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा यांना दि.६.१.२०१८ रोजी प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मेहकर यांनी ग्रामशिंदी गावात दि.१८.१.२०१८ आणि दि.१८.२.२०१८ रोजी अचानक धाड टाकून कारवाई केली असता तेथे काहीही आक्षेपार्ह आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर एलसीबीच्या वसई दमण बनावटीच्या वेगवेगळया ब्रँडची बनावट दारु पकडून ४ जणांना अटक केल्याबाबत**

**(४६) १०६८०४ (०४-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर एलसीबीच्या वसई शाखेने कारवाई करुन एका इनोव्हा कारमध्ये दमण बनावटीच्या वेगवेगळया ब्रँडची बनावट दारु पकडून ४ जणांना अटक केल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मद्याची अवैधरित्या वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे स्थानिक गुन्हे शाखा, वसई युनिट यांनी विरार पोलिस स्टेशन येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अन्वये गु.र.नं. ३६/२०१८ दाखल केलेला आहे. त्यामध्ये ४ इसमांना अटक करण्यात आलेली असुन रु.२०,९३७/- इतक्या रकमेची दारु वाहनासह जप्त केली आहे. मद्याचे नमुने रासायनिक पृथ:करणासाठी पाठविण्यात आलेले आहेत. प्रकरणाचा तपास चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**शबरी आदिवासी विकास महामंडळाकडून आदिवासी लाभार्थ्यांसाठी कोणत्याही योजना सुरु नसल्याबाबत**

**(४७) १०७१७८ (०४-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शबरी आदिवासी विकास महामंडळाकडून आदिवासी लाभार्थ्यांसाठी शासनाने गेल्या दोन वर्षापासून कोणत्याही योजना सुरु केलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्यासाठी शबरी आदिवासी महामंडळाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीयकृत बँकांच्या सहकार्याने मार्जिन मनी योजनेंतर्गत अल्प व्याजदराने अर्थ सहाय्य करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, मर्या. नवी दिल्ली यांच्याकडून उपलब्ध होणारे कर्ज/निधी राज्यातील आदिवासी बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याज दराने अर्थ सहाय्य केले जाते. या योजनेसाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनास कर्जासाठी हमी देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर हमी प्राप्त झाल्यास महामंडळामार्फत जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना लाभ होऊ शकेल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आश्रमशाळा संस्थाच्या इमारतीना सार्वजनिक विभागाने ठरवून दिलेल्या रक्कमेचे ७५ टक्के भाडे पूर्वीप्रमाणेच सुरु करणेबाबत**

**(४८) १०९११७ (०४-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आश्रमशाळांच्या इमारतींना सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या रक्कमेचे ७५ टक्के भाडे पूर्वीप्रमाणेच सुरु करावे, अशी मागणी येथील व्यवस्थापनाने संबंधित विभागाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत भाडे मिळत नसल्याचे निदर्शनास आले असून शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) इमारत भाडे बंद करण्याबाबतचा कोणताही निर्णय शासनस्तरावरुन अद्याप घेण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरेगाव पार्क (जि.पुणे) येथील आदिवासी वसतीगृहाच्या इमारतीची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(४९) १०९६०४ (२७-०३-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव पार्क (जि.पुणे) येथील आदिवासी वसतीगृहाच्या इमारतीची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतीगृहाची इमारत जीर्ण अवस्थेत असून कुठल्याही क्षणी कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आणून दिले असतानाही संबंधित प्रशासनासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वसतीगृहाच्या इमारतीची दुरुस्ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०४-२०१८) :** (१) कोरेगाव पार्क (जि.पुणे) येथील आदिवासी वसतिगृह समाजकल्याण विभागाच्या अधिनस्त शासकीय इमारतीत कार्यरत होते. समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभाग वेगवेगळे झाल्यानंतर सदर वसतिगृह आदिवासी विकास विभागाकडे वर्ग झाले आहे. सदर वसतिगृहाची इमारत जुनी आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) सद्यस्थितीत सदर इमारतीतील स्नानगृहे व शौचालये सुस्थितीत असून ते वापरण्यास योग्य आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगांव यांचेकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय वसतिगृह इमारतीची दुरुस्ती करणेबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु असून या इमारतीच्या दुरुस्तीचा आराखडा प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

## सिंदेवाही (जि.चंदपूर) तालूक्यातील उमा नदीवर व बोकरडोह नाल्यावर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(५०) ११०८५४ (०४-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदेवाही तालुक्यातील (जि.चंद्रपूर) कुकडहेटी कळमगगाव कोठा मुरमाडी रस्त्यावरील इजिमा १४० वर उमा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करणे यासाठी रु. ९ कोटी आणि सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम करणे या दोन्ही मोठया पुलाचे बांधकामास आदिवासी विभागाने मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह इजिमा १३० नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी ७.५० लक्ष च्या कामास जरी मंजूरी देण्यात आली असेल तरी या निधीमध्ये सदर पुलाचे बांधकाम करता येत नसल्यामूळे त्याऐवजी ७ कोटी ५० लक्ष रूपये निधीची आवश्यकता आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच कुकडहेटी कळमगगाव कोठा मुरमाडी रस्त्यावरील इजिमा १४० वर उमा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी ९ लक्ष च्या कामास जरी मंजूरी देण्यात आली असेल तरी या निधीमध्ये सदर पुलाचे बांधकाम करता येत नसल्यामूळे त्याऐवजी ९ कोटी रूपये निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोन्ही पुलाचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्यामूळे बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी ७ कोटी ५० लक्ष आणि कुकडहेटी कळमगगाव कोठा मुरमाडी रस्त्यावरील इजिमा १४० वर उमा नदीवर मोठया पुलाचे बांधकाम करण्यासाठी ९ कोटी रूपये एवढी तरतुद करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०४-२०१८) :** (१) व (२) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम इजिमा १३० तसेच कळमगांव कोठा मुरमाडी रस्त्यावर उमा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे इजिमा ४१ या कामांना दि.१५.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,चंद्रपूर यांनी शिफारस केल्यानुसार अनुक्रमे रु.७.५० लक्ष व रु.९.०० लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

(३) अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांनी सिंदेवाही रामाळा गडबोरी रस्त्यावर बोकरडोह नाल्यावर मोठया पुलाचे बांधकाम,इजिमा १३० व कळमगांव कोठा मुरमाडी रस्त्यावर उमा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम, इजिमा ४१ ही कामे मंजूर केलेल्या अनुक्रमे रु.७.५० लक्ष व रु.९.०० लक्ष किमतीमध्ये करणे शक्य नसल्याचे कळवून सदर कामे वगळण्यासाठी प्रस्तावित केली होती.

(४) व (५) प्रस्तुत पुलाची दोन्ही कामे ही मार्च, २०१७ च्या विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज भाग ३ मधील परिशिष्ट ड मधून वगळण्यात आलेली आहेत. तसेच या कामांचा समावेश मार्च, २०१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आलेला नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**